ISSN 2229-6190
RNI. MAHMUL02937/2010/35848

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

3

# SOCIAL GROWTH

PRINCIPAL
Govt. College of Arts & Sci
Aurangabad

Govt. College of Arts & Science
Aurangabad.

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

RNI. MAHMUL02937/2010/35848

IMPACT FACTOR -5.90

ISSN 2229-6190

SOCIAL GROWTH

Issue : XVII, Vol. I, Nov. 2018 To April 2019

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Reflective Practices in Teacher Education B.Ed. Colleges of Teaching and Learning<br>**Dr. G. T. Khurpe** | 1 |
| 2 | Comparative Study of Body Composition Between Male and Female of Post Graduate Student<br>**Mahadev K. Malbhage , Dr. Vaishali Madekar** | 5 |
| 3 | Need for Value Based Education in Higher Education in India<br>**Ramesh Sonwalkar** | 10 |
| 4 | महाराष्ट्रातील स्मार्ट सिटी मिशन एक भौगोलिक अभ्यास<br>**डॉ.बळीराम पी. लहाने** | 20 |
| 5 | शिक्षक प्रशिक्षणाची बदलती भूमिका : दिशा आणि दशा<br>**डॉ. मारुती एस. माने** | 24 |
| 6 | स्त्रियांच्या विकासामध्ये सावित्रीबाई फुले यांचे योगदान<br>**शिवलिंग उमाकांत नागापुरे** | 31 |
| 7 | स्वामी दयानंद सरस्वतीच्या आर्य समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>**डॉ.दादाराव डी. पानपट्टे** | 36 |
| 8 | पद्मभूषण वसंतदादा पाटील यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील भूमिका<br>**डॉ.संजय एस. सपकाळ** | 41 |
| 9 | महात्मा जोतीबा फुले यांचे सामाजिक कार्य आणि सत्यधर्म<br>**डॉ.कमल दिगंबर बर्चे** | 49 |



Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XVII, Vol. I, Nov. 2018 To April 2019 20

4

# महाराष्ट्रातील स्मार्ट सिटी मिशन एक भौगोलिक अभ्यास

डॉ.बळीराम पी. लहाने
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नांदेड विभाग, नांदेड, जि. नांदेड

*Research Paper - Geography*

**प्रस्तावना:**

एकेकाळी भारत देश एक भक्कम स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जायचा. या देशातील खेडी ही स्वयंपूर्ण होती. कोणत्याही प्रकारे खेड्याला शहरावर अवलंबून राहण्याची गरज नव्हती. त्याचे कारण म्हणजे खेड्यास ग्राम उद्योग, कुटीर यांची भरभराट होती. परंतू जसजसा आपला जागतिक अर्थव्यवेस्थेशी संबंध वाढत गेला तसतशी ग्रामीण अर्थव्यवस्था ढासळत गेली. जागतिकीकरणाने तर रोजगाराचा केंद्रबिंदूच बदलला. ग्रामीण भागातील लोंढेच्या लोंढे रोजगाराच्या निमित्ताने शहराकडे धाव घेऊ लागले. शहराजवळील खेडी ओस पडून ग्रामीण अर्थव्यवस्था मुखआधार असलेला शेती व्यवसायातही उध्वस्त होत गेला.सोबतच या ग्रामीण भागातील लोंढ्याना सामावून घेता घेता नगराची महानगरे झाली. विज, पाणी, आरोग्य सुविधा पुरविण्याच्या मोठा प्रश्न या नगरावर येऊन पडला. नागरीकरणाच्या जटील समस्या निर्माण होऊ लागल्या या समस्येवर उपाय म्हणून केंद्रसरकारने आंतरराष्ट्रीय धरतीवर स्मार्ट सिटी योजनाची सुरुवात केली.

**स्मार्ट सिटी ची संकल्पना :**

स्मार्ट सिटीची नेमकी व्याख्या नसली तरी शहराला सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच सेवाना तंत्रज्ञानाची जोड देणे, शांतता आणि सुव्यवस्था राखणे, शिस्त, काटेकोर नियम पालन, गुन्हेगारीला आळा आपत्ती व्यवस्थापन या साज्यावर स्मार्ट सिटीमध्ये भर दिला जातो. थोडक्यात गतिमान प्रशासन, तंत्रज्ञानाचा वापर सर्व समावेशक विकास आणि नागरिकांना दर्जेदार व उच्च प्रतिव्या सोयी सुविधा देणे हा स्मार्ट सिटीचा गाभा आहे. यामुळे राहणीमान उंचावते व प्रत्येक व्यक्ती

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH Issue : XVII, Vol. I, Nov. 2018 To April 2019 

कार्यक्षम होवू शकतो. अशा प्रकारचे प्रकल्प जगातील ॲमस्टरडफू, कैरो, दुबई, एडबरो, माल्टा, साऊथम्पटन आदी शहरात शहरात राबविले गेले आहेत.

**स्मार्ट सिटीची वैशिष्ट्ये:**

१. सर्व मुलभूत सुविधा असलेले सर्वसामान्य नागरीकरांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणारे आणि आधुनिक तंत्रज्ञानाने संपन्न शहर.

२. २४ तास वीज आणि पाणीपुरवठा, पर्यावरणपुरक प्रमाली, उर्जाक्षम इमारती मलनि:सारण व्यवस्था सर्व मुलभूत व आवश्यक सुविधांचे व्यवस्थापन.

३. जलद प्रवासासाठी कल्पक वातुक, एकात्मिक मल्टीमॉडेल वाहतूक प्रणाली, उर्जाक्षम इमारती व घनकचज्यावर खतनिर्मिती.

४. गुन्हेगारीवरसि.सी.टीव्हीच्या मदतीने देखरेख.

५. जन्म मृत्यू दाखल्यावर विविध प्रमाणापत्रासह ऑनलाईन व्यवस्था.

६. शाळा, कॉलेज, पार्क, खेळाची मैदान, आरोग्य सुविधा, उद्योग व्यवस्था, बाजारापेठा, रेल्वे स्थनिक आणि विमानतळ इत्यादी सुविधा ही स्मार्ट सिटीची वैशिष्ट्ये आहेत.

**स्मार्ट सिटी मिशन:-**

स्मार्ट सिटी मिशन हा भारत सरकारचा नागरी पुनविकरण आणि सुधारणा कार्यक्रम असून यात संपूर्ण देशात नागरीकानेही स्थायी स्वरुपात १०० टक्के विकसीत करण्याचे उद्दीष्ट्ये ठेवण्यात आले. त्या त्या शहरांचा राज्य सरकारांच्या सहकार्याने केंद्रीय नागरी विकास मंत्रालयाने हे मिशन राबवायचे आहे. जून २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिठी मिशनचस प्रांरभ केला. या मिशननुसार देशात १०० शहरे ही मोठ्या शहराची उपशहरे म्हणून विकसीत करण्याचे किंवा मध्यम आकाराच्या शहराचे आधुनिकीकरण करण्याचे ध्येय ठेवले आहे. यासाठी देशात स्मार्ट सिटीज कौन्सिल ऑफ इंडिया ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील स्मार्ट सिटी चा पहिला टप्पा:**

देशभरातून निवड झालेल्या शंभर शहरांपैकी महाराष्ट्रातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि सोलापूर या दहा शहरांचा समावेश स्मार्ट सिटी योजनेत झाला असला तरी तीन वर्षानंतरही ही योजना कागदावरच रेंगाळतांना दिसून येते. स्मार्ट सिटी योजनेसाठी केंद्र सरकारने ५ वर्षात ४८ हजार करोड रुपयांचे बजेट मंजूर कले असून त्यामध्ये प्रत्येक वर्षाप्रती शहराला १०० कोटी रुपयांची आर्थिक सहायता केली जाणार आहे. त्यासोबतच्या योजनेसाठी यु.एल.बी. फंडातून १ लाख कोटी रुपये उभे केला जाणार आहेत. ठाणे महापालिकाकेला आतापर्यत ४५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असला तरी आतापर्यत केवळ ५८ कोटीचाच निधी खर्च करण्यात आला आहे. कल्याण-डोंबिवलीची ऑगस्ट २०१६ मध्ये

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.90
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XVII, Vol. I, Nov. 2018 To April 2019 

निवड झाली मात्र या प्रकल्पाअंतर्गत आजतागायत एकाही कामाला सुरुवात झाली नाही. या अंतर्गत महापालिकेला ३०० कोटीचा निधी प्राप्त झला आहे.

नाशिक महापालिकेला २१९४ कोटी रुपयाचा या स्मार्ट सिटी आराखड्यासाठी भरघोष निधी उपलब्ध झला असला तरी जून्याच कामांना करण्याचे काम महानगरपालिका करीत आहे. सोलापूर महानगरपालिका ३१२ कोटी रुपये उपलब्ध झाले असून एकुण ४२ प्रकल्पापैकी १४ प्रकल्प सुरु झाली आहेत. पुणे महानगरपालिकेने ५६ प्रकल्पाच्या आराखडा तयार केला असून ११ प्रकल्प पूर्ण केले. १९ प्रकल्प सुरु अहेत. ९ प्रकल्पाच्या निविदा निघाल्या असून १३ प्रकल्पाचा डिपीआर तयार झाला आहे. माग ६ अगदीच प्राथमिक चर्चेत अहेत.

औरंगाबाद महानगरपालिकेला या प्रकल्पाअंतर्गत २३० कोटी रुपयाचा निधी प्राप्त झाला असून देखील यामध्ये अजून कोणत्याही कामाचा श्रीगणेशा झाला नाही. तर अमरावती महानगरपालिका या योजनेतून बाद करण्यात आली.

नागपूर महानगरपालिका मात्र देशात या कामाबाबत पहिला क्रमांक मिळवला आहे. मोठ्या प्रमाणात कामे येथे सुरु आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे या योजनेतून पाय काढून घेतला तर मुंबई महापालिकेची सत्ताधारी शिवसेनेने या योजनेवरच आरोप घेतला अहे. असे असले तरी औरंगाबाद, ठाणे या शहरासाठी अनुक्रमे २३० व ४३० कोटीचा निधी बँकेतच पडून आहे. कल्याण-डोंबिवली कामाचा श्रीगणेशा नाही. अमरावतीने चार चार वेळा पाठविलेले प्रस्ताव निवड समितीने फेटाळून लावले. त्या शहराला या योजनेतून बाद केले. तर मुंबईला अंतीम यादीतून वगळण्यात आले आहे. तर महापालिका आदि स्मार्ट सिटी प्राधिकरणामध्ये कोणताच समन्वयनसल्यामुळे शहराची स्थिती अधिकच गंभीर बनत चालल्याचे पुणे महानगरपालिकाच्या उदाहरणावरुन दिसुन येत आहे. वास्तविक अशी आहे की, सद्याच्या प्रशासकीय रचनेत शहराचा विकास महापालिकेतूनच होऊ शकतो. अपल्याला गावाचा खेड्याचा विकास करण्याची गरज आहे. पायाभूत सुविधा अभावी खेडी व शहरे यांच्यात प्रचंड दुरी असल्याने विकासाचा समतोल वाढत असून त्याचा तान शहरी ग्रामीण अर्थव्यवस्थेवर पडत आहे. त्यामुळे देशाला शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या तीन गोष्टीवर आधारित स्मार्ट खेड्याची आवश्यकाता आहे. अशा प्रकारच्या टिका या योजनेवर होत आहेत.

अशा प्रकारे स्मार्ट योजनेचा अंमलबजावणीचा पहिल्या टप्प्याच संपला आहे. या स्मार्ट सिटी योजनेचे यशापयाशयाचा विचार करता असे दिसून येते की, कोणतीही योजना यशस्वी करायची असेल तर त्यासाठी दुरदृष्टी नेत्राची आवश्यक ता आहे आणि अशाप्रकारची दुरदृष्टी नुतृत्व नागपुर मध्येच दिसून आले. म्हणूनच तर नागपूर १०० स्मार्ट सिटी मिशनमध्ये नंबर १ वर अग्रेसर शहर बनले आहे.

पुणे महानगरपालिकेने देखील मोठ्या प्रमाणात यश संपादन केलेआहे. ५८ प्रकल्पापैकी ५०

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
A... ...ad

टक्के प्रकल्प पुर्णतवास येत आहे. आज केवळ पहिल्याच टप्पा पूर्ण झाला आहे. त्यामध्ये आत्ताच योजनेच्या एकदम टोकाकडे जाणे शक्य नाही. नाही म्हटले तरी या योजनेअंतर्गत १० या शहरांना मोठ्या प्रमाणात विकासासाठी निधी प्राप्त होत आहे. त्यामधून शहराला वायफायची सुविधा, ग्रीन फिल्ड विकास योजना, नाले-मलनिसारण यंत्रणा बांधणे, सी.सी.टी.व्ही यंत्रणा शैक्षणिक संस्था, रुग्णालये, शौचालय , पर्यटन केंद्र इत्यादी आदी कामे होऊन भविष्यात निश्चितच शहरे स्मार्ट होतील यात शंकाच नाही.


# ज्योतीचंद्र पब्लिकेशन, लातूर.

## ISBN नंबर नुसार पुस्तक प्रकाशनाची सुवर्ण संधी

**वैशिष्ट्ये :-**

१) विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व इतर लेखकांचे पुस्तक 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ISBN नंबर नुसार प्रकाशित करणे.

२) संशोधक, प्राध्यापक यांच्या M.Phil, Ph.D. संशोधनात्मक पुस्तकांना विशेष प्राधान्य.

३) यु.जी.सी. च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षणामध्ये कार्यरत संशोधनार्थी व प्राध्यापक यांना आपले पुस्तक ISBN नुसारच प्रकाशित करणे आवश्यक आहे. तरी, संशोधनार्थी व प्राध्यापक यांनी आपले मौलिक साहित्य ISBN नुसार प्रकाशित करून घ्यावे, ही विनंती.

**- संपर्कासाठी पत्ता -**

प्रकाशक,
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
"ग्यानदेव-पार्वती", R-9/139/6, विशाल शाळेजवळ,
एल.आय.सी. कॉलनी, प्रगती नगर, लातूर.
ता. जि. लातूर - 413531.(महाराष्ट्र),भारत
**ऑफिस फोन नं. - 02382 - 241913**
मो. नं.9423346913, 9503814000, 9637935252, 7276301000


Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad